जा. क्र. माध्य. ३(१४)/नुतनीकरण/पुवि९६
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे -१ यांचे कार्यालय.
दिनांक :- 3 FEB 1996

प्रति,

शिक्षण अधिकारी (माध्य.),
जिल्हा परिषद, पुणे.

विषय :- सन १९९३-९४ या वर्षी परवानगी दिलेल्या माध्यमिक शाळेच्या आदेशाचे ९४-९५ या शैक्षणिक वर्षापासुन नुतनीकरण करण्याबाबत.

संदर्भ :- शासन पत्र क्र. एसएसएन-१०९५/५२०२/माशि-१, दिनांक २०/१/१९९६........

उपरोक्त विषयाचे संदर्भिय पत्रांस अनुसरुन कळविण्यात येते की, बन्सीलाल रामनाथ अगरवाल चॅरिटेबल ट्रस्ट पुणे या संस्थेस बिबवेवाडी, पुणे येथे मराठी माध्यमाची माध्यमिक शाळा सन ९३-९४ पासुन सुरु करण्यास शासनाने परवानगी दिलेली होती. तथापि परवानगी आदेश उशिरा मिळाल्याने सदर संस्थेस त्या वर्षी शाळा सुरु करता आली नाही. याबाबत संस्थेने केलेली विनंती विचारात घेवुन सन ९३-९४ या वर्षी दिलेल्या परवानगी आदेशाचे नुतनीकरण करुन जुन १९९३ ऐवजी जुन १९९४ पासुन त्याच ठिकाणी माध्यमिक शाळा सुरु करण्यास संदर्भिय शासन आदेशान्वये शासनाने परवानगी दिलेली आहे. सदर परवानगी शासन पत्र क्रमांक एसएसएन-१०९५/५४९६/माशि-१, दिनांक २७/१०/९५ चे पत्रात नमुद केलेल्या अटी व शर्तींची पुर्तता करण्याचा शर्तीवर देण्यात येत आहे.

तरी याबाबत आवश्यक ती कार्यवाही करुन संबंधित संस्थेस तात्काळ कळविण्यात यावे.

स्थळ प्रतीवर शिक्षण उपसंचालक
यांची स्वाक्षरी आहे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे

प्रत: सचिव,
बन्सीलाल रामनाथ अगरवाल चॅरि...
283, बुधवार पेठ, पुणे-2.